केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियान(NLM) राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत 'पशुधन विमा योजना' (Livestock Insurance Scheme) राज्यात राबविण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**शासन शुध्दीपत्रक क्रमांक - डीएएचडी-१४०२६/४/२०२६/पदुम-४(ई-१७६९४१३)**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई–४०००३२

दिनांक: ०६ ऑगस्ट, २०२६

**संदर्भ:–**

१. कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक–डीएएचडी-१४०२६/४/२०२६/पदुम-४ (ई१७६९४१३), दि. ०५.०८.२०२६.

२. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सूचना, जानेवारी, २०२५.

**शुध्दीपत्रक:-**

वाचा क्र. १ येथील दि. ०५.०८.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात राष्ट्रीय पशुधन अभियांनातर्गत पशुधन विमा योजनेस मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परि. क्र. **४.३ (२)** मधील “प्रत्येक कुंटुब कमाल पशुधन संख्या:- १० पशुधन” व त्याखालील “(एखाद्या लाभार्थ्याकडे १० पेक्षा जास्त पशुधन असल्यास व सदर पशुधनासाठी विमाकवच घेण्यास पशुपालक इच्छुक असल्यास **१०** पेक्षा जास्त असलेल्या पशुधनासाठी विमा हप्त्याची पूर्ण रक्कम पशुपालकाने भरणे आवश्यक राहील.)”

या मजकुराऐवजी पुढील मजकुराचा समावेश करण्यात येत आहे.

४.३ (२) **“प्रत्येक कुंटुब कमाल पशुधन संख्या:** -१० पशुधन घटक
*(एखाद्या लाभार्थ्याकडे १० पशुधन घटकापेक्षा जास्त पशुधन घटक असल्यास व सदर पशुधनासाठी विमाकवच घेण्यास पशुपालक इच्छुक असल्यास १० घटकापेक्षा जास्त असलेल्या पशुधनासाठी विमा हप्त्याची पूर्ण रक्कम पशुपालकाने भरणे आवश्यक राहील.)”*

तसेच ४.३ (११) मधील क्र.( १०) येथील “नुकसान भरपाईसाठी विमा प्रस्ताव सादर केल्यानंतर ५ दिवसाच्या आत प्रस्तावास मंजूरी देणे बंधनकारक राहील.”

या मजकुराऐवजी पुढील मजकुर समाविष्ट करण्यात येत आहे.

४.३ (११) (१०) “नुकसान भरपाईसाठी विमा प्रस्तावासाठी आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर ५ दिवसाच्या आत प्रस्तावास मंजूरी देणे बंधनकारक राहील.”

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०८०६१६३५३६५९४५ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आलेला आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.08.06 16:38:35 +05'30'

**(नि. भा. मराळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, कृषी मंत्रालय, नवी दिल्ली.
७) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर (अंमलबजावणी यंत्रणा).
९) सर्व जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
११) निवड नस्ती (पदुम-४).